d1

जा.क्र./उविमहु/135/२०२२.
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
दिनांक : 20 JAN 2023

प्रति,

..................................
..................................
..................................

**विषय : सोलार सिस्टीम दुरूस्तीबाबतचे दरपत्रक सादर करणेबाबत.........**

महाशय,

वरील विषयाबाबत असे कळविण्यात येते की, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे च्या वसतिगृहातील सोलार सिस्टीम दुरूस्ती करावयाची असुन त्याकरीता आवश्यक साहीत्य खरेदी करावयाचे आहे. तरी खालील तपशिलाप्रमाणे सोलार सिस्टीम दुरूस्तीचे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशिल | आवश्यक प्रमाण | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | Hitlon Pipe | 16 ft | सदर सोलर सिस्टीम युनिट दुरूस्तीसाठी लागणारे साहीत्य व सिस्टीम पुन्हा कार्यान्वित करून घेण्यासाठी होणारी मजुरी याचे दर नमुद करावेत. |
| 2 | Clip | 60 | |
| 3 | CPVC Pipe | 50ft | |
| 4 | Ball valve | 3 | |
| 5 | Union | 1 inch | |
| 6 | Other material | | |
| 7 | Installation charges | 2 unit | |

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे **सोलार सिस्टीम दुरूस्तीचे** दर नमुद करुन याबाबतचे दरपत्रक या कार्यालयात दि. 1/2/2023 प्राप्त होईल अशा तऱ्हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होण्याऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.**

१) दरपत्रक बंद लखोटयातून सादर करावे व त्यावर **" सोलार सिस्टीम दुरूस्तीचे दरपत्रक"** असे स्पष्ट नमुद करावे.
२) दरपत्रकात दिलेले दर हे सर्व करांसहीत स्पष्टपणे नमुद करावे.
३) दरपत्रकातील दर हे साहित्य उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ कार्यालयास पोहोच देण्याचे असावे.
४) दरपत्रक **सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग – ४१६५२०** या पत्यावर पाठवावे.
५) दरपत्रकात या पत्राच्या संदर्भाचा उल्लेख असावा.
६) टपालाद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
७) सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
८) दरपत्रकांवर जी. एस. टी. नंबर नमुद करावा.
९) नमुद करण्यात आलेले आवश्यक प्रमाण कमी/जादा होवु शकते.
१०) सदरची सोलर सिस्टीम दुरूस्त केल्यानंतर किती कालावधी पर्यंत सुरळीत चालेल याबाबत स्पष्टपणे नमुद करावे तसेच त्या कालावधीत पुन्हा बिघाड झाल्यास त्याची संपूर्ण दुरूस्तीबाबतची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील. असे ठेकेदाराने दरपत्रकात स्पष्टपणे नमुद करावे.

आपला विश्वासू

सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग